**महाराष्ट्र शासन**
**वित्त विभाग**
**संचालनालय लेखा व कोषागारे,**
**मुंबई पोर्ट ट्रस्ट ,ठाकरसी हाऊस, तिसरा मजला,**
**शुरजी वल्लभदास मार्ग, बॅलार्ड इस्टेट, फोर्ट, मुंबई - ४०० ००१.**
दुरध्वनी क्रमांक :- २२६२२०२९ / २२६२२०३६-०२२
ईमेल :-ad.admin@mahakosh.in संकेत स्थळ :- www.mahakosh.in

संदर्भ :- १) संचालनालयाचे आदेश क्र.संलेको-८-२०१७/प्रशा.सलेअ.राप./सअ-१/न.क्र.१०५/८० % नि.नि./२०१७/६१५, दिनांक १०/०८/२०१७.
२) संचालनालयाचे आदेश क्र.संलेको ३.-२०१८/प्रशा.अराप/सलेअ.संवर्ग/न.क्र.१०५ (१)/नि.नि.आदेश रद्द /३७५, दिनांक ३०/०५/२०१८.

********************************************************************************

क्र.संलेको २.२०२०/प्रशा सलेअ/स.अ-१ /न.क्र.१०५(१) /८०% नि.नि.२०१७/पद. मिळणेबाबत/२५१ दि. 09 MAR 2020

**-: परिपत्रक :-**

**विषय :- महाराष्ट्र वित्त लेखा सेवा सहाय्यक लेखा अधिकारी संवर्ग गट-ब राजपत्रित नियुक्ती व पदस्थापना.**

संचालनालयाच्या दिनांक १०/०८/२०१७ च्या आदेशान्वये एकूण २०७ कर्मचा-यांना यांना म.वि.ले.से. संवर्गातील सहाय्यक लेखा अधिकारी गट -ब (राप) या पदावर नियुक्ती व पदस्थापना देण्यांत आली होती. सदर आदेशान्वे ३० दिवसांच्या कालावधीमध्ये परंतु जे कर्मचारी पदस्थापनेच्या पदावर रुजू झाले नाहीत अशा एकूण ४१ कर्मचा-यांचे नियुक्ती आदेश संचालनालयाचे दिनांक ३०/०५/२०१८ रोजीच्या आदेशान्वे **८ महीन्याच्या प्रदिर्घ कालावधीनंतर** प्रशासकीय कारणस्तव रद्द करण्यांत आले.

**वित्त विभाग अधिसूचना दि.२८/०९/२०१८ नुसार सहाय्यक लेखा अधिकारी गट (ब) राजपत्रित यांचे सुधारीत सेवाप्रवेश नियम लागू झाले. सदर अधिनियमातील तरतूदी या दिनांक ०६/०१/२०१७ पासून अमंलात आले असल्याचे नमूद आहे त्यानुसार संचालनालयाच्या दि.१०/०८/२०१७ च्या आदेशान्वे ८०% कोटयातून दिलेली निवडीने नियुक्ती ही सरळसेवा नियुक्ती ठरते.** त्या अनुषंगाने सरळसेवेने नियुक्ती दिलेल्या उमेदवारांकरीता सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय दिनांक २८ मे २०१८ मधील मुद्या क्रं.१ मध्ये सरळसेवेने नियुक्तीचे आदेश निघाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत रुजू होण्याची तरतूद आहे. त्यानुसार उमेदवार नियुक्ती आदेशाच्या तारखेपासून विहीत कालावधीत रुजू झाला नाही तर तो नोकरीची संधी गमावेल व त्याचा नियुक्तीकरीता विचार करण्यात येणार नाही. यासाठी उमेदवारांकडून देण्यात येणा-या कोणत्याही कारणांचा/विनंतीचा विचार केला जाणार नाही अशी तरतुद आहे. **सबब संचालनालयाने दिनांक ३०/०५/२०१८ रोजी रद्द केलेल्या एकूण ४१ उमेदवारांचा पुढील निवडसूची मध्ये समावेश करता येणार नाही.**

(ज.र. मेनन)
**संचालक, लेखा व कोषागारे,**
**महाराष्ट्र राज्य, मुंबई.**

C:\Users\Administrator\Desktop\SHINDE.docx